# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

## दि.२१.८.२००९ रोजी झालेल्या मंडळाच्या २४५ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

**बाब क्रमांक २४५/२ : आझाद नगर,अंधेरी (पश्चिम) या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र.२६ आझाद नगर चैत्रा को.ऑ.हौ.सो.लि.,न.भू.क्र. ८३६ (पैकी) या म्हाडा कॉलनीच्या पुनर्विकासाकरीता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) अंतर्गत इमारतीच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर केलेला प्रस्ताव.-पुन्हा सादर.**

**ठराव क्रमांक :२४५/२५९७** **दिनांक :२१ /०८/०९.**

**इमारत क्रमांक २६, आझादनगर चैत्रा सह.गृह.संस्था, आझाद नगर, अंधेरी या संस्थेस**

१. **संस्थेस इमारती पुनर्बांधणी प्रस्तावास विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत अभिन्यासातील (२.५ चटई क्षेत्र निर्देशांका नुसार) ६७७.३३ चौ.मी.क्षेत्राच्या एकत्रित भूखंडावर एकूण १६९३.३३ चौ.मी.बांधकाम क्षेत्र वितरणाचा** मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. **संस्थेस अनुज्ञेय एकूण बांधकाम क्षेत्रफळ १६९३.३३ चौ.मी. मधुन अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ६१२.८० चौ.मी. वगळुन उर्वरीत अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ १०८०.५३ चौ.मी.ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडि रेकनर दर २००९ अनुसार रु.२०,४००/- (रु.५१,०००/- च्या ४० % दराने) प्रती चौ.मी.रहिवासी दराने आकारणी करुन,वितरण करण्याकरीता** मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. संस्थेस फुटकळ जागा (टिट-बीट) ८५.२७ चौ.मी. म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर दराच्या ५०% दराने (रु.५१,०००/- च्या ५० % दराने म्हणजेच रु.२५,५००/- प्रती चौ.मी.) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४५/३: खेर नगर,वांद्रे-पुर्व.,या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र.१७ खेर नगर, मयुर सह.गृह.संस्था.मर्या.न.भू.क्र.६०७ पैकी म्हाडा कॉलनीच्या पुनर्विकासाकरीता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५)नुसार म्हाडा कडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव. पुन्हा सादर**

**ठराव क्रमांक :२४५/२५९८** **दिनांक :२१ /०८/०९.**

इमारत क्र.१७ खेर नगर, मयुर सह.गृह.संस्था.मर्या.**या संस्थेस**

१. **संस्थेस इमारती पुनर्बांधणी प्रस्तावास विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत अभिन्यासातील (२.५ चटई क्षेत्र निर्देशांका नुसार) १८३३.८९ चौ.मी.क्षेत्राच्या एकत्रित भूखंडावर एकूण ४५८४.७२ चौ.मी.बांधकाम क्षेत्र वितरणाचा** मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. **संस्थेस अनुज्ञेय एकूण बांधकाम क्षेत्रफळ ४५८४.७२ चौ.मी. मधुन अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ १७७८.१४ चौ.मी. वगळुन उर्वरीत अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ २८०६.५८ चौ.मी.ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडि रेकनर दर २००९ अनुसार रु.१२,९६०/- (रु.३२४००/- च्या ४० % दराने) प्रती चौ.मी.रहिवासी दराने आकारणी करुन,वितरण करण्याकरीता** मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. संस्थेस फुटकळ जागा (टिट-बीट) १८०.०० चौ.मी. म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर दराच्या ५०% दराने (रु.३२४००/- च्या ५० % दराने म्हणजेच रु.१६२००/- प्रती चौ.मी.) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४५/४ : जेव्हीपीडी येथील भूखंड क्र.६/७,मरहबा सह.गृह.संस्थेच्या इमारतीचा हस्तांतरणीय विकास हक्क वापरुन पुर्नविकास करण्याबाबतचा प्रस्ताव.**

**ठराव क्रमांक :२४५/२५९९** **दिनांक : २१/०८/०९.**

जेव्हीपीडी येथील भूखंड क्र.६/७,मरहबा सह.गृह.संस्थेच्या, प्रस्तावाबाबत मा.सभापती/मुंबई मंडळ यांनी विचारलेल्या सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत सादर करण्यात यावे.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

## मा.सभापती/मुंबई मंडळ यांच्या मान्यतेने चर्चेस घेतलेले विषय

१. नविन दिंडोशी, मालाड (पूर्व) येथील इमारत क्र २८ संकल्प सिध्दी या इमारतीस होणारा अपुरा पाणीपुरवठा बाबत :-

ठराव क्रमांक :२४५/२६०० दिनांक : २१/०८/०९.

नविन दिंडोशी, मालाड (पूर्व) येथील सर्व इमारतींना व रो हाऊसेसला पाणीपुरवठा समप्रमाणात व्हावा याकरीता इतर संस्थांनी जलवाहिन्यांमध्ये केलेले फेरबदल रद्द करुन पाणीपुरवठा वाहीन्या पूर्ववत करण्यात याव्यात व या पूर्ववत केलेल्या जलवाहिन्यांमध्ये कोणत्याही संस्थेने पुन्हा फेरबदल करु नये याकरीता मॉनिटरींग सिस्टीम नेमण्यात यावी. या जलवाहीन्या पूर्ववत करण्याचे काम मेसर्स शिर्के कंपनीस देण्यात यावे व मॉनिटरींगचे

काम शिर्के कंपनीस पुढील ६ महिने कालावधीसाठी देण्यात यावे. जलवाहिनी पूर्ववत करण्याचा व पुढील ६ महिन्यांसाठी मॉनिटरींग करण्याचा खर्च मंडळाने करावा.सर्व संबंधीत गृहनिर्माण संस्थांना जलवाहिन्यांची फेरबदल न करण्याबाबत कळविण्यात यावे व आलेला खर्च सर्व गाळेधारकांकडून समप्रमाणात संबंधित मिळकत व्यवस्थापक यांनी वसुल करावा. त्यानंतर नविन दिंडोशी, मालाड येथील सर्व संस्थांनी मिळुन तयार होणा-या फेडरेशनला जलवाहिन्या हस्तांतरीत करण्यात याव्यात. या पध्दतीने अपयश आल्यास स्वतंत्र जलजोडणी टाकण्याबाबत विचार करण्यात यावा.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**२) गुलमोहर सोसायटी, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम) येथील रहिवाश्यांची विनंती-**

**ठराव क्रमांक :२४५/२६०१** **दिनांक : २१/०८/०९.**

गुलमोहर सोसायटी, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम) येथील न्यायप्रविष्ट सदनिकांचे विक्री किंमतीबाबत म्हाडाचे १९९२ चे ठराव क्र ३०९४ विक्री धोरणाप्रमाणे विक्री किंमत आकारणे किंवा अन्य एखादी अभय योजना राबवून व उच्च न्यायालयाचा आदर करुन यातुन मार्ग काढता येईल का ? याबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. प्रशासनाने गुलमोहर सोसायटी, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम) येथील न्यायप्रविष्ट सदनिकांचे विक्री किंमतीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**३) शासनाने विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) अंतर्गत बांधण्यांत आलेल्या म्हाडाच्या वसाहतींप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली ३३ (१२), (३२) अंतर्गत बांधण्यांत आलेल्या व इतर म्हाडाच्या वसाहतींना २.५ चटईक्षेत्र निर्देशांक देण्याबाबत-**

**ठराव क्रमांक :२४५/२६०२** **दिनांक : २१/०८/०९.**

शासनाने विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) अंतर्गत बांधण्यांत आलेल्या म्हाडाच्या वसाहतींप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली ३३ (१२), (३२) अंतर्गत बांधण्यांत आलेल्या व इतर म्हाडाच्या वसाहतींना २.५ चटईक्षेत्र **निर्देशांक देण्याबाबत प्रस्ताव** शासनाकडे पाठविण्यासाठी मुंबई मंडळ म्हाडाकडे शिफारस करीत आहे.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.